जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

शनिवार दि.२३ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ७७

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्यूज 8459977904 epaper.lokneta.in

# महायुतीची सत्ता आल्यास एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार?

## शिवसेना नेत्यांची मोर्चेबांधणी; भाजपाचाही पाठिंबा?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून निकालाबाबतचे एक्झिट पोल देखील समोर आले आहेत. अनेक एक्झिट पोलमधून राज्यात महायुतीची सत्ता येईल अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. पाठोपाठ महायुतीमधील सर्वच नेत्यांनी दावा केला आहे की राज्यात आम्हालाच बहुमत मिळेल आणि आम्ही लवकरच राज्यात सरकार स्थापन करू. मात्र, राज्यात महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण होणार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे? त्यावर महायुतीमधील नेत्यांनी वेगवेगळ्या नेत्यांची नावं घेतली आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या निकालाआधीच महायुतीत मुख्यमंत्रिपदावरून रस्सीखेच चालू आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली होती. मात्र आता महायुतीमधील नेत्यांनी लवचिकता दाखवण्यास सुरुवात केली आहे.

एकीकडे शिवसेनेच्या नेत्यांनी म्हटलं आहे की मुख्यमंत्रीपद आमच्याकडे आल्यास एकनाथ शिंदे राज्याचं नेतृत्व करतील. तर, भाजपाने देखील त्यास विरोध केला नाही.

शिवसेना आमदार व प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, आम्ही महायुती म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुकीला सामोरे गेलो. आम्ही एकनाथ शिंदे यांचा चेहरा घेऊन निवडणूक लढवली. राज्यातील जनतेने एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्याला पसंती दर्शवली आहे. त्यामुळे आम्हाला वाटतं की मुख्यमंत्रीपदावर एकनाथ शिंदे यांचा हक्क आहे. निकालानंतर तेच राज्याचे मुख्यमंत्री होतील अशी आम्हाला खात्री आहे. आम्हाला मनापासून वाटतं की तेच मुख्यमंत्री व्हावेत आणि ते होतील याची आम्हाला खात्री आहे.यावर मंत्री व भाजपा नेते मंगलप्रभात लोढा म्हणाले, एकनाथ शिंदे सध्या मुख्यमंत्री आहेत. मात्र निवडणुकीच्या निकालानंतर तिन्ही पक्षांमधील प्रमुख नेते एकत्र बसून चर्चा करतील



व मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतील. एकनाथ शिंदे मुख्यमत्री झाले तरी आम्हाला आनंदच होईल. त्यांच्याऐवजी दुसरा एखादा नेता मुख्यमंत्री झाला तरी आम्हाला आनंद आहे. ही गोष्ट आमचे तीन प्रमुख नेते ठरवतील.दरम्यान, यावर आता शिवसेनेचे (शिंदे) नेते व गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, जनतेचा, मतदारवर्गाचा, महिलावर्ग, शेतकरी, तरुणांचा प्रतिसाद पाहिला तर आलेले एक्झिट पोल हे जनतेचा कल पाहूनच आहेत हे स्पष्ट होतंय. निवडणुकीतील आमचा प्रचार, जनतेकडून मिळालेला प्रतिसाद, आलेले एक्झिट पोल पाहता असं वाटतंय की महायुती बहुमताच्या आकड्यापेक्षा बरीच पुढे जाईल आणि आम्ही मोठ्या बहुमताने सत्तेत येऊ. राहिला प्रश्न सरकारचं नेतृत्व कोण करणार याचा, तर तिन्ही प्रमुख पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून चर्चा करतील आणि निर्णय घेतील. मित्रपक्षांनी देखील ही गोष्ट स्पष्ट केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र बसतील व मुख्यमंत्रीबदाबाबतचा निर्णय घेतील. शिवसेनेची देखील तीच भूमिका आहे. शिवसेना म्हणून किंवा शंभूराज देसाई म्हणून तुम्ही माझं वैयक्तिक मत विचारलंत तर मी सांगेन की एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हायला हवेत. आमचं सर्वांचंच कायम हेच मत राहिलं आहे. मुख्यमंत्रीपद शिवसेनेकडे आल्यास आमच्या पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे हेच सरकारचे प्रमुख व्हावेत असं माझं मत आहे.

# पेठवडज ते नांदेड बस मध्ये प्रवाशांचा जिवघेणा प्रवास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

पेठवठज येथे एसटी महामंडळाच्या बसने प्रवाशांना जीव घेणा प्रवास करावा लागतोय ४४ आसन क्षमता असलेल्या बसमध्ये ७० प्रवाशांना जीव घेणा प्रवास करावा लागत आहे.

तरी शासनाने पेठवडज ते नांदेड बसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी देवीचीवाडी, मंगनाळी, कळका, पेठवडज, सिरसी, गोणार, वरवंट, राहटी, बारूळ, मंगलसांगवी, औराळ, ,येथील प्रवाशांना काही खाजगी व शासकीय कामानिमित्त दवाखान्याच्या, बँकेच्या, शाळा कॉलेज, जाण्याकरता कसरत करावी लागत आहे प्रवाशांनी मुखेड आगार प्रमुखांना बसच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी केली आहे..



# आज होगा लोहा विधानसभे का सिकंदर

## सर्वांच्या नजरा व कानं निकालाकडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर | गणेश लोखंडे**

कंधार लोहा विधानसभा २०२४ निवडणूकीसाठी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदानाचा टक्का वाढल्यामुळे आज २३ रोजी होणाऱ्या मतमोजणी कडे भावी आमदाराबरोबर कार्यकर्ते यांची धकधक वाढल्यामुळे लोहा विधानसभा मतदारसंघाचा खराखुरा दबंग..., सिकंदर ,... वाघ... म्हणण्यासाठी तमाम जनतेच्या नजरा व कानं निकालाकडे लागल्या आहेत.

१४ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद झाल्या नंतर मतदार संघात आगामी आमदार कोण? यांचीच चर्चा सर्वत्र रंगताना दिसत होती. अनेकांनी आपल्या कडून आमुक उमेदवार किंवा आमचा उमेदवार निवडून येणार म्हणत शर्यती लागत आहेत. भरमसाठ



मतदान झाल्यामुळे महायुती व महविकास आघाडी च्या कार्यकर्त्यांना आपलची सिट लागणार असल्याचे बोलत आहेत.

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची रंगीत तालीम असल्याचे सांगितले जात आहे. कारण आतापर्यंत ग्रामपंचायत निवडणूकीसाठी अशा प्रकारे मतदान होत होते. अनेक गावातील वार्डा वार्डात कॉर्स मतदान झाल्यामुळे मोठी डोके दुखी वाढली होती. शनिवारी सकाळ पासून मत मोजणी ला प्रारंभ होणार असल्याने अनेकजण म्हणत आहेत आज होगा लोहा विधानसभे का सिकंदर..... कोणाच्या नावाने फटाक्यांची आतषबाजी होणार याचीच चर्चा होताना दिसत आहे.फक्त आता काही क्षणाची वाट पाहत कानं व नजरा निकालाकडे लागल्या आहेत.

# खासदारांचे बीड पोलीस अधिक्षकांना आव्हान



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | अमोल सावंत**

बीड जिल्ह्यातील तालुका परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड. माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे मतदाना च्या दिवशी जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली.हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही. बीड पोलीस अधीक्षक साहेबांना माझे आवाहन आहे की, ड. माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे खासदार सोनवणे यांनी म्हटले आहे.

# मा.आमदार रमेश थोरात यांनी खानवटे येथे केले भोसले कुटुंबियांचे सांत्वन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

खानवटे ता.दौंड येथील दत्तात्रय भोसले यांच्या सुस्ना कै.स्वाती संजय भोसले (वय ३४) वर्ष रा.खानवटे ता.दौंड यांचे दि.(२१) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

यावेळी माजी.आमदार रमेश (आप्पा) थोरात यांनी भोसले कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करून धीर दिला. आणि म्हणाले की आपल्या कुटुंबांला काही मदत लागल्यास मी मदत करण्यास तयार आहे.आणि मी भोसले कुटुंबियांचे पाठीशी सुदैव उभा राहील.असे म्हणून भोसले कुटुंबियांना आधार दिला.पुढे बोलताना थोरात म्हणाले की घरातील तरूण महिला गेल्यानंतर त्या कुटुंबाची अवस्था बिकट होते.आणि घरातील व्यक्ती गेल्यानंतरच माणसाची किंमत कळते.म्हणून सर्वांनी एकत्र कुटुंबात राहून सदैव आनंदी जिवन जगावे.

आणि कुटुंबात जिव्हाळा कायम ठेवावा.माणसाचे आयुष्य हे क्षणभंगुर आहे,त्यामुळे प्रत्येकाशी गोडीने आणि नम्रपणे वागावे आणि हसत खेळत जिवनाचा आनंद पुरेपूर घ्यावा.

कोणाबद्दलही मनात द्वेश ठेवू नये. यावेळी दौंड पंचायत समितीचे मा. उपसभापती उत्तमराव आटोळे,खानवटे गावचे माजी सरपंच मच्छिंद्र पोटफोडे,मा.सरपंच अशोकराव गायकवाड,सामाजिक कार्यकर्ते भिमराव पवार,माजी.उपसरपंच किशोर माहुरकर, सोसायटीचे मा.चेअरमन हनुमंत ढवळे,मा.सरपंच शंकर पवार,रामभाऊ कन्हेरकर,शरदराव ढवळे,रमेश पोटफोडे, महेश भोसले,रामदास धायतोंडे,हनुमंत भोसले,ईत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# धर्माबाद येथे सी.सी.आय मार्फत कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

धर्माबाद केंद्र शासनाच्या आधारभूत योजने अंतर्गत धर्माबाद बाजार समितीच्या क्षेत्रामध्ये दि. २२ नोव्हेंबर २०२४ रोजी शुक्रवारी सी. सी. आय. (कॉटन कार्पोरेशन आफ इंडिया) कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ येथील बन्नाळी रोड वरील एल.बी.कॉटन इंडस्ट्रीज धर्माबाद येथे करण्यात आला आहे.

कापसाची आधारभूत किंमत रु. ७५२१/ प्रति क्विंटल मिळणार असून विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर आठ दिवसाच्या आत रक्कम जमा होणार आहे. पहिल्याच दिवशी तेरा शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्री साठी आणला आसुन एकुण



२३० कुंटल कापूस खरेदी झाली आसल्याची माहिती व्यसथापक यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना दिली. कापूस विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी खालील अटी पूर्ण कराव्या लागणार आहेत. कापूस विक्री करणारा शेतकरी हा स्वतः उपस्थित राहून पूर्व नोंदणी करावी. कापूस पिक पेरा असलेला डिजिटल सातबारा असावा. शेतकऱ्याचे बँक खात्यात मोबाईल नंबर आणि आधार कार्ड लिंक असणे आवश्यक आहे. वर्ष २०२४ – २०२५ या वर्षाचा कापूस पीक पेरा असलेला डिजिटल सातबारा असावा. कापसाची आर्द्रता( मॉइश्चर) ८–१२ टक्के पेक्षा जास्तीचे नसावे यापेक्षा जास्त असल्यास कापूस स्वीकारला जाणार नाही. या शुभारंभ प्रसंगी एलबी कॉटन चे मालक धर्मेंद्र पांडे, मनोज पांडे, अमन पांडे, सुरज पांडे ग्रेडर प्रमोद मिश्राम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव चंद्रकांत पाटील, सहसचिव वैभव कुलकर्णी, लेखापाल शाम आटकळे, निरिक्षक लिंबाजी गुर्जलवाड, लिपीक राजेश रेणके, व्यापारी मन्मथ अप्पा रोषनगांवकर,माजी नगरसेवक बिरप्पा मदनुरकर, आदि मान्यवर ची उपस्थिती होती. धर्माबाद मार्केट समितीच्या परिसरातील शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान मार्केट समितीचे प्रशासक जी. आर. कौरवार व सचिव चंद्रकांत पाटील जुन्नीकर यांनी केले आहे.

# पहिला निकाल परळीचा तर आष्टी सर्वात शेवटी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठवण वाजेपासून सुरु होईल, पहिला निकाल परळीचा तर सर्वात शेवटचा निकाल आष्टी मतदार संघाचा लागेल अशी माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पत्रकार परिषदेत दिली.


महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २० नोव्हेंबर रोजी पार पडली. बीड जिल्ह्यात सहा विधानसभा मतदारसंघात शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. पाच ते सहा ठिकाणी अप्रिय घटना घडल्या. त्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मतमोजणी प्रक्रिया २३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजेपासून सुरु होईल. प्रत्येक ठिकाणी १४ टेबल वर ही प्रक्रिया सुरु होईल. सुरवातीला तपाली मतमोजणी होईल, त्यानंतर इव्हीम मशीन वरील मतमोजणी सुरु होईल.

मतदान प्रक्रिया दरम्यान अनेक ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध नव्हत्या. पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह, निकृष्ट जेवण, लाईट ची सुविधा नव्हती. बीडच्या उपजिल्हाधिकारी कविता जाधव आणि गेवराईचे धुमाळ यांनी शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना जी अपमानस्पद वागणूक दिली त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती पाठक यांनी दिली.बीड, माजलगाव, गेवराई या ठिकाणी २९ फेऱ्या होतील. तर आष्टी मध्ये सर्वाधिक ३४फेऱ्या होतील. केज आणि परळी या ठिकाणी २८ फेऱ्या होतील. सर्वात पहिला निकाल हा परळीचा अपेक्षित असून शेवटचा निकाल आष्टीचा लागेल.मतमोजणी प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अशी माहिती पाठक यांनी दिली.

## संपादकीय..

# निवडणुका संपल्या; आता विकासावर बोला!



कोकणात तर निवडणूक जाहीर कधी झाली आणि मतदान कधी झाले तेच कळले नाही, अशा वातावरणातही निवडणूक पार पडली आहे. उर्वरित महाराष्ट्रात निवडणुकीत अनेक बऱ्या-वाईट घटना घडल्या असल्या तरीही आपल्या कोकणात अत्यंत शांततेच्या आणि सलोख्याच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पडली. कोकणातील उमेदवारांचे भवितव्य मतांच्या रूपाने ईव्हीएम मशीनमध्ये लॉक करण्यात आले. त्यामुळे आता कोकणातील विकासावर बोला, असा आवाजही काहीसा ऐकू येत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी कालच म्हणजे २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका कशा पद्धतीने पार पडल्या हे महाराष्ट्रातील जनतेने अनुभवले आहे. महाराष्ट्र राज्य विकासाच्या बाबतीत पुढे कसे नेता येईल यावर राज्यातील अशा महत्त्वपूर्ण असणाऱ्या निवडणुकीत चर्चा होणे अपेक्षित होते; परंतु निवडणुकीतील उमेदवारांनी आपण आजवर विकासकामांमध्ये योगदान काय दिलंय आपण कोणत्या पद्धतीने आपल्या भागाचा, मतदारसंघाचा विकास करणार आहोत याविषयी जनतेसमोर मांडणे हे अपेक्षित होते; परंतु विकास प्रक्रियेवर काहीही न बोलता विरोधी पक्षांकडून, विरोधी नेत्यांकडून वैयक्तिक स्वरूपाची टीका करण्यात आली.

या निवडणुकीत कोकणातील वातावरण हे अतिशय छान होते. मात्र शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख, उबाठाच्या महिला नेत्या सुषमा अंधारे, शरद कोळी, शिवसेना उबाठाचे युवानेता आदित्य ठाकरे यांची भाषणे ही पातळी सोडून झाली. या निवडणुकीत राणेंवर वैयक्तिक टीका करण्यात आली. खालच्या पातळीवर टीका करायची आणि समोरच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची माथी भडकवायची जेणेकरून वातावरण कशारितीने बिघडविता येईल, असा प्रयत्न शिवसेना उबाठाकडून सतत करण्यात आला; परंतु ॲक्शनला रिॲक्शन न देता त्याला संयमीत राहण्याने आपोआपच चोख उत्तर उबाठा सेनेला मिळाले. यामुळे शिवसेना उबाठा गटाच्या हाती काहीच लागले नाही.निवडणुकीत सगळी चर्चा आणि भाषणे ही महायुतीकडून विकासावरच होत राहिली. भाजपा-शिवसेना महायुतीच्या उमेदवारांनी आपापल्या मतदारसंघाच्या विकासाचा प्लॅनच जनतेसमोर मांडला. मालवण शहरातील अरूंद रस्ते, तिथली भौगोलिक स्थिती या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार माजी खासदार निलेश राणे यांनी यूट्युबर्सना दिलेल्या मुलाखतीतून मालवण शहराला रिंग रोडणे कशा पद्धतीने जोडले जाऊ शकते, वाहतूक कोंडीचे प्रश्न कसे निकाली निघू शकतात याचा खास प्लॅन सांगितला गेला. कोकणातील विकासाच्या बाबतीत अशा पद्धतीने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडून विकासाचा मॅप सादर केला गेला पाहिजे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात आठ मतदारसंघ आहेत. या आठही विधानसभा मतदारसंघात या अशा पद्धतीने त्या-त्या मतदारसंघातील जनतेसमोर विकास प्रक्रियेची मांडणी आवश्यक होती. सत्ताधारी भाजपा महायुती उमेदवारांकडून ते सादर करण्यात आले. नोव्हेंबर २०२४ मधील या विधानसभा निवडणुकीने अनेकार्थाने एक आगळ्या-वेगळ्या पद्धतीने निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला आहे. या निवडणुकीत जाहीर प्रचार सभांचे प्रमाण कमी होऊन थेट जनतेशी संवाद साधत प्रचार करण्यावर भर देण्यात आला आहे. या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना उबाठा गट आणि भाजपा, शिवसेना एकनाथ शिंदे गट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अशा महायुती आघाडीतील घटक पक्ष यांच्यातील ही निवडणूक आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेनेतील पक्ष संघटना फुटीनंतरची महाराष्ट्रातील राजसत्ता कोणाच्या हाती सोपवावी त्याचा निर्णय करणारी तसेच या निवडणूक निकालानंतर महायुती आणि महाविकास आघाडीतील वर्चस्व ठरवणारी ही निवडणूक आहे. पक्षीय वर्चस्व आणि महत्त्वपूर्ण स्थान ठरवणारी ही निवडणूक आहे. कोणत्याही पक्षाने, नेत्याने, गाव पुढाऱ्यांनी गावाला आणि ग्रामस्थांना गृहीत न धरता गावातील प्रत्येक ग्रामस्थ मतदार हा तितकाच महत्त्वाचा आहे. हे दर्शवणारी ही निवडणूक आहे. महाराष्ट्रातील पत्रकार, राजकारणी, समाजकारणी अशा राज्यातील सर्वच घटकांना नवीन काही शिकवणारी अशी ही निवडणूक आहे. एकीकडे विविध राजकीय पक्षाचे स्थान निश्चित होत असताना निवडणुकीत निवडणूक लढविणारे उमेदवार निवडून आल्यानंतर पुढील पाच वर्षांत आपल्या भागासाठी खरोखरीच काही करू शकतील का? याचा विचारही आता मतदार करू लागले आहेत. केवळ मतदारांशी गोड बोलून, भेटत राहूनही चालत नाही. जनतेला विकास दाखवावा लागतो. जनतेला विकासकाम काय केले हे सांगावे लागते. जनतेचाही त्यावर विश्वास बसावा लागतो. याचे कारण फेख नॅरेटीव पसरवण्यासाठी समाजमाध्यमांवर काही टीम कार्यरत असतात. हा अनुभवही गेल्या वर्षभरातील निवडणुकांनी दाखवून दिला आहे. यामुळे यावेळची ही महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक सर्वांनाच अनेक गोष्टींचे धडे देणारी आहे. कोकणातील ही निवडणूक एकीकडे सतत कोसळत राहणारा पाऊस मागील आठवडाभर कोकणातील हा पाऊस थोडाफार कमी झाला आहे. या अशा पावसाळी वातावरणात निवडणूक पार पडली. दिवाळीच्या सणामध्येच निवडणुकीची आचारसंहिता आणि उत्साहाचे वातावरण याच उत्साही वातावरणात निवडणूक पार पडली आहे. कोकणात तर निवडणूक जाहीर कधी झाली आणि मतदान कधी झाले तेच कळले नाही, अशा वातावरणात ही निवडणूक पार पडली आहे. उर्वरित महाराष्ट्रात निवडणुकीत अनेक बऱ्या-वाईट घटना घडल्या असल्या तरीही आपल्या कोकणात अत्यंत शांततेच्या आणि सलोख्याच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पडली. पालघर, रायगड, रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग या कोकणातील निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य मतांच्या रूपाने ईव्हीएम मशीनमध्ये लॉक करण्यात आले आहे. २३ नोव्हेंबर शनिवारी निवडणूक निकालाने महाराष्ट्रात सत्ता कोणाची येईल हे निश्चित होईल.

# बेकायदा होर्डिंगबाजीवर मुंबई हायकोर्टाचा मोठा निर्णय

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी लागेल. त्यानंतर राज्यात कुठेही बेकायदा होर्डिंग किंवा बॅनरबाजी होता कामा नये, असे मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी स्थानिक प्रशासन आणि पोलिसांना स्पष्टपणे बजावले, हे अत्यंत स्वागतार्ह आहे.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्या. अमित बोरकर यांचे खंडपीठ केवळ आदेश देऊन थांबले नाही तर ही कारवाई यशस्वी होईल, याची खबरदारी राज्याचे गृह सचिव, पोलिस महासंचालक आणि पालिका प्रशासन विभागाच्या संचालकांवर थेट सोपवून त्यांना उत्तरदायी केले. सुस्वराज्य फाऊंडेशनची ही याचिका तशी जुनी. त्यावर जानेवारी २०१७मध्येच न्यायालयाने कारवाईचे आदेश दिले होते. त्यानंतर काही काळ राज्यात रस्ते आणि चौकांनी मोकळा श्वास घेतला, मात्र पुढे 'ये रे माझ्या मागल्या' म्हणत दुप्पट वेगाने बॅनरबाजी सुरू झाली. त्यानंतर न्यायालयाने 'सुओ मोटो' अवमान याचिका दाखल करून घेतल्या होत्या, पण यावेळी न्यायालयाने त्याऐवजी मूळ जनहित याचिकाच सुनावणीसाठी घेतली, हे महत्त्वाचे.

फ्लेक्सवरची छपाई सोपी झाली आणि ही स्वस्त प्रसिद्धी राजकीय पक्षांसह, स्थानिक दादा, अण्णा, भय्या आणि ताईंच्या पथ्यावर पडली. यांनी आपल्या अवाढव्य छायाचित्रांनी रस्ते, चौक, इमारती झाकून टाकल्या. बॅनरबाजी केवळ निवडणुकांपुरती राहिली नाही. कधी कुणा गॉगलधारी, सोनसाखळ्यांनी लगडलेल्या भय्याचा वाढदिवस, खाली शुभेच्छुक टोळीची छायाचित्रे, तर कधी कुणाचे निधन, दशक्रिया; हे थेट बॅनरमधूनच कळवायची पद्धत रुळली. वधू-वरांच्या छायाचित्रांसह भव्य लग्नपत्रिका गावांच्या वेशीवर दिसू लागल्या. हे कमी म्हणून की काय, चक्क समर्थांघरच्या लाडक्या श्वानांचे वाढदिवसही फलकांवर झळकतात! गावागावांतले मोठे रस्ते, चौक, बस आणि रेल्वे स्थानके अशा बेकायदा फलकांनी व्यापले आहेत. शून्य कलात्मकता असलेले बेगडी आणि भडक फलक गाव आणि शहराच्या सौंदर्याला बाधा पोहोचवतात, याची किंचितशी जाणीवही फलकबाजांना नसते.

न्यायालयाने स्पष्ट निर्णय देऊनही महापालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायती याकडे दुर्लक्ष करतात. सोमवारच्या सुनावणीत सोलापूर महापालिकेने पूर्ण शहरात एकही बेकायदा होर्डिंग नसल्याचे प्रतिज्ञापत्रावर सांगितल्याकडे ॲड. उदय वारुंजीकर यांनी लक्ष वेधले, यातून प्रशासनाचे निर्ढावलेपण दिसते. न्यायालयाने यापुढच्या विशेष मोहिमांचे तपशील पालिका प्रशासनांकडून मागवले आहेत. पक्ष, नेते, संस्था आणि उत्साही कार्यकर्त्यांनी यांचे उल्लेखही त्यात अपेक्षित आहेत. ही कारवाई या निवडणुकीपुरती मर्यादित राहू नये. शहर आणि गावांचे विद्रूपीकरण कायमचे थांबवण्यासाठी हे कायद्याच्या भाषेत सतत सांगण्याची गरज आहे.



# महाराष्ट्रातील वाढीव मतदानाचा कौल कोणाच्या बाजूने?

महाराष्ट्रातील महासंग्राम तूर्त शमला आहे. मतदानाची वेळ सायंकाळी पाच वाजता संपली तरी सात वाजून गेल्यानंतरही कित्येक केंद्रांवर मतदारांच्या मोठ्या रांगा होत्या. त्यामुळे, सायंकाळी पाचपर्यंत ५८ टक्के मतदानाचा अंदाज हंगामी ठरून आज नेमका वाढीव आकडा बाहेर येण्याची अपेक्षा आहे. तो काही टक्क्यांनी जास्त असेल. आता हे वाढीव मतदान निकालांवर काय परिणाम करणार? बुधवारी सायंकाळी अनेक मतदानोत्तर कलचाचण्यांचे अंदाज येऊ लागले तरी त्यांची विश्वासार्हता विरळच असते, हे आधीही दिसले आहे.

निकालांचे घोडामैदान जवळ असताना यांच्या किंवा त्यांच्या विजयाचे पतंग उडविण्यात काही अर्थ नाही. अर्थात, अनेक वर्षे राजकारण करणारे, पाहणारे आणि वेगवेगळ्या सरकारी व इतर यंत्रणा मतदानाच्या टक्केवारीवरून अंदाज बांधत असतात. मतदान जास्त झाले की ते प्रस्थापितांच्या विरोधात जाते, असे नेहेमीच म्हटले जाते. तसे अनेकदा दिसतेही. मात्र, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचे जे निकाल लागले त्यानंतर सगळेच पक्ष, त्यांच्या समविचारी संघटना एकदम सावध व सक्रिय झाल्या. विधानसभेला मतदानाची टक्केवारी वाढायलाच हवी, असा चंग अनेक संघटना, गटांनी बांधला. अनेक शहरांमध्ये गृहरचना संस्थांचे गट बांधून बुधवारी दिवसभर मतदान होते की नाही किंवा तसे ते करण्यात काय अडचण आहे, याचा आढावा घेण्यात आला. पुण्यासहित अनेक शहरांमध्ये सुशिक्षित मतदारांमध्ये ही जी नवजागृती दिसली, ती स्वागतार्ह आहे.सुशिक्षित किंवा सुस्थित मतदारांना लोकशाही प्रक्रियेत अनेक त्रुटी दिसाव्यात आणि त्यांनी मतदान टाळावे आणि त्याचवेळी, ज्यांच्या झोपड्यांमध्ये स्वातंत्र्याचा व समृद्धीचा सूर्य अजून पुरेशा तेजाने झिरपलेला नाही, त्यांनी मात्र उत्साहाने मतदानास यावे; हा अंतर्विरोध मागेही दिसत आला आहे. बुधवारी एकेकाळचा माओवादग्रस्त गडचिरोली जिल्हा आणि मुंबई शहर व उपनगरे यांच्या मतदानाच्या टक्केवारीतील मोठा फरक पाहिला तर कथित सुशिक्षितांचे 'प्राथमिक शिक्षण' अजून किती बाकी आहे, याचा प्रत्यय येतो. कोणत्या भागात, कोणत्या समाजाचे, कोणत्या वर्गाचे, कोणत्या वयोगटाचे मतदार बाहेर पडले; यावरून राजकीय पक्ष अंदाज बांधत असतात. मात्र, मतदारांनी विक्रमी मतदान करावे, अशी अपेक्षा असणारा निवडणूक आयोग तशी तयारी करतो का, असा प्रश्न पडतो.



लोकसभेला अनेक मतदान केंद्रांवरच्या रांगा – विक्रमी मतदान नसूनही – रात्री उशिरापर्यंत आटोपत नव्हत्या. या दृष्टीने पुण्यातील एक आकडेवारी पाहण्यासारखी आहे. तेथे एका बूथवर १०५२ मतदारांचे मतदान होते. दुपारी तीनपर्यंत ४५० नागरिकांनी मतदान केले. म्हणजे ५० टक्क्यांपेक्षा कमीच. ४५० मते होण्यास जर सकाळी सातपासून आठ तास लागतात, तर सगळे मतदार आले असते तर मध्यरात्रच उलटली असती. थोडक्यात, मतदान वाढवायचे तर मतदानाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि आणखी सोपी करण्याची गरज आहे. 'लोकसभेला आम्ही मतदान केले पण बुधवारी आमचे नावच यादीतून गायब झाले होते...' अशा अनेक तक्रारी 'महाराष्ट्र टाइम्स'कडे आल्या. हे प्रशासनाचे तसेच मतदार नोंदणीकडे लक्ष ठेवणाऱ्या राजकीय पक्षांचे अपयश आहे. शहरांमध्ये वृद्धांसाठी घरी मतदान किंवा व्हील चेअर, वाहनांची सुविधा हे सगळे झाले असले तरी याच सुविधा महाराष्ट्रातल्या प्रत्येक छोट्या गावात उपलब्ध होत्या का?

विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती पाहता कधी तरी परदेश, परराज्ये किंवा प्रवासात असणाऱ्या मतदारांनाही दूरस्थपणे मतदान करण्याची सुविधा द्यावी लागेल. सध्या सरकारी, संरक्षण दलांच्या सेवेत किंवा निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी आधी टपालाने मते पाठविण्याची सोय आहे. तंत्रज्ञानाची मदत घेऊन तिचा प्रभावी विस्तार करावा लागेल. महाराष्ट्राच्या शहरांमधील हजारो तरुण-तरुणी परदेशांत काम करतात. मात्र, तेथे नागरिकत्व मिळाले नसल्याने किंवा ते घेतले नसल्याने हे सगळे भारतीय नागरिकच असतात. सगळ्यांना इतका प्रवास करून मतदानाला येता येत नाही. परदेशात राहणारी काही मंडळी मात्र आवर्जून मतदानाला मायदेशी येतात, हेही इथे नमूद करायला हवे. अशा सर्व परदेशस्थ भारतीय नागरिकांना मतदानाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी तंत्रवैज्ञानिक उपाय उद्या योजावेच लागतील.

बुधवारी समाजमाध्यमांवर दिवसभर नाजूक जांभळकाठी रेखलेल्या हजारो तर्जन्या अभिमानाने मिरवत होत्या. इतरांनाही 'गेलात का, कधी जाताय?' असे जणू विचारत होत्या. हे चित्र सुखद होते. यावेळी मतदानाच्या निमित्ताने झालेली ही जाणीवजागृती पुढची पाच वर्षे कायम राहायला हवी आणि मतदान केलेलीच तर्जनी उद्या आमदारावर रोखून लोकहिताचे ठोस सवालही विचारले जायला हवेत. आता दोन दिवस वरवर शांततेत गेले की २३ तारखेला नवा खेळ चालू होईल. तेव्हा मतदारांना पश्चात्ताप होणार नाही, इतकी जाणीव सर्व पक्षांनी व आमदारांनी राखावी, ही अपेक्षा!

# दिल्लीकरांचा श्वास कोंडला!

दरवर्षी नेमाने येणाऱ्या हिवाळ्याइतक्याच नेमाने उद्भवणाऱ्या विषारी वायू प्रदूषणामुळे विलक्षण असहाय परिस्थितीत दोन कोटींहून अधिक दिल्लीकर गेला किमान आठवडाभर आला दिवस ढकलत आहेत. बुधवारी सलग पाचव्या दिवशी दिल्लीतील वायू गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) सरासरी ५०० अंकांच्या अतिगंभीर पातळीवर राहिला. केवळ दिल्ली व राष्ट्रीय राजधानी क्षेत्रासह (एनसीआर) बहुतांश उत्तर भारतात दर हिवाळ्यात प्रदूषणाची अक्राळविक्राळ समस्या उभी ठाकते व विस्मरणातही जाते.

दाट धुरक्याच्या (स्मॉग) पडद्यात गेले काही दिवस हरवलेल्या दिल्लीसारख्या खोलगट प्रदेशात हिवाळ्याच्या कालावधीत उबदार हवा जमिनीपासून थोड्याच अंतरावर स्थिर होते. वाहने, कारखान्यांचा धूर, रस्ते तसेच बांधकामांमुळे उडणारी धूळ, शेतातील काडीकचरा (पाचट) जाळल्याने शेजारच्या राज्यांतून येणारा धूर, दिवाळीत बेबंद फटाकेबाजांनी केलेला धूर हे सारे या हवेत अडकते. त्यातून अतिसूक्ष्म विषारी धूलिकण माणसाच्या थेट फुफुस्सात घुसखोरी करतात. यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, डोळे जळजळणे, गिळण्यास त्रास होणे, घसा खवखवणे या समस्या उद्भवतात. दिल्ली-एनसीआरमधील कोट्यवधी आबालवृद्ध धूम्रपान न करताही गेले काही दिवस प्रत्येक दिवशी सुमारे ४० ते ५० सिगारेटी ओढल्याप्रमाणे प्रदूषित वायू व धूर श्वासाबरोबर आत घेत आहेत.



दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबरनंतर एखादा जोरदार पाऊस होतो. तसा पाऊस झाला की निसर्गाच्याच कृपेने वातावरण निवळते. हवा स्वच्छ होते. तसे झाले की प्रदूषण हा शब्दच दिल्लीकर निदान तात्पुरता तरी विस्मरणात ढकलून देतात. परिणामी आरोप-प्रत्यारोपांची राळ उडवण्यात तसेच निष्क्रियतेचे पांघरूण ओढून घेणाऱ्या धोरणकर्त्यांचे आणि प्रशासनाचे फावते. ग्रेप-३ स्तराचे प्रदूषण निर्मूलन निर्बंध वेळीच का लागू केले नाहीत, या सर्वोच्च न्यायालयाच्या सवालाला ना केंद्राकडे उत्तर आहे, ना दिल्लीतील सरकारकडे उत्तर आहे.दिल्ली ही भारताची राजधानी असल्याने येथील छोट्याशा घटनेचेही जागतिक पडसाद उमटत असतात. बीजिंग किंवा लॉस एंजलिससारख्या महानगरांतील प्रदूषणावर उपाय शोधण्यात चीन व अमेरिकेला यश येत असेल तर भारतातच याला अडथळे का यावेत? याचे एक उत्तर राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हे आहे. 'ज्या समस्येमुळे सर्व संबंधितांचा संभवतः फायदाच होतो ती सोडवण्यात सारे उदासीन असतात,' ही उक्ती इथे आठवते.

# अष्टपैलू व्यक्तिमत्व दिलीपभाऊ ठाकूर

लोकनेता न्यूज नेटवर्क

राजकारण आणि प्रशासन दोन्हीचा व्यवस्थित ज्ञान असलेला नेता म्हणजे दिलीपभाऊ ठाकूर. गेल्या तीन लोकसभा निवडणुकीचा भारतीय जनता पार्टीच्या कार्यालय प्रमुख म्हणून त्यांनी अतिशय नियोजन बद्द संपूर्ण निवडणूक यंत्रणा हाताळली.

दिलीपभाऊ ठाकूर म्हणजे मूळ हिंदुत्ववादी विचाराचा कट्टर शिवसैनिक कार्यकर्ता गेल्या अनेक वर्षांपासून अविरत समाजकार्य करणारा.अनेकदा लव्ह जिहाद सारखे प्रकरणात कार्यकर्त्यांना रोख ठोक सर्व प्रकारची मदत करणारा बाळासाहेब ठाकरे ह्यांचा कडवट शिवसैनिक म्हणजे दिलीपभाऊ.समाजकारण करत असताना अनेकदा निवडणुकीमध्ये पराजय आल्यानंतर आपले समाजकार्य किंवा हेतू बंद करणारे अनेक महाभाग असतात, पण हा माणूस अतिशय सामान्य कुटुंबातला असूनही गेल्या अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या विषयांमध्ये अविरत सेवा कार्य करणे. समाजातील उपेक्षित अंतोदयासाठी झटणारा अविरत समाजसेवक. ग्रामीण भागातून दवाखान्यासाठी आलेल्या नातेवाईकांना आणि रुग्णाला मोफत डबा देणारा भाऊ. लोकांना मॉर्निंग वॉक बद्दल आणि शरीराच्या बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या लोकांची सुद्धा पायी चालणाऱ्यांची स्पर्धा घेणारा, ५० महिन्यापासून स्वखर्चाने शेकडो भ्रमिस्टांचा कायापालट, हिवाळ्यात ब्लँकेट वाटप, पावसाळ्यात छत्री वाटप, उन्हाळ्यात चप्पल वाटप अशा वेगवेगळ्या विविध ९० उपक्रमांना लोकसहभागातून चालवत असताना कधीही न थकणारा व अविरत कार्य करणारा सच्चा समाजसेवक. नांदेड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून शहराला भूषण वाटणाऱ्या व्यक्तीला नांदेड भूषण असं गौरव देऊन सन्मान करतो.हा माणूस गेल्या पंचवीस वर्षापासून भारतातील सर्वात मोठे कवी संमेलन नांदेडला घेत आहे. नांदेडकरांना हिंदी कवितांची गोडी, अमरनाथ यात्रेची ओढ, गंगा पूजनाची भक्ती व पदयात्रेची सवय फक्त दिलीपभाऊ मुळे लागली हे कोणीही कबूल करेल. राजकारणात नवीन येणाऱ्या कार्यकर्त्यांचा जर कार्यकर्ता म्हणून कुठे ट्रेनिंग घ्यायचा असेल तर त्याचा उत्तम प्रशिक्षण स्थळ म्हणजे दिलीपभाऊ. राजकारणात काम करताना



येणाऱ्या अडचणी आणि खूप घेण्यात येणारे सामाजिक उपक्रम याचे संपूर्ण माहिती असणारा परिपूर्ण माणूस म्हणजे दिलीपभाऊ ठाकूर.

नांदेड जिल्ह्यात शिवसेनेचे पाळेमुळे घट्ट करण्यात ज्यांनी सिंहाचा वाटा उचलला अशा कै. आमदार प्रकाशभाऊ खेडकर यांच्या सुरुवातीपासूनच्या काळात शेवटच्या क्षणापर्यंत आणि तदनंतर अनुसयाताई खेडकर यांची निवडणूक प्रमुख म्हणून ज्यांनी अतिशय नियोजन रित्या कार्य केले. नांदेड शहराचे महापालिकेचे दोन वेळा नगरसेवक राहिलेले चतुरस्त्र व्यक्तिमत्व म्हणजे दिलीपभाऊ. या निवडणुकीमध्ये नेहमीप्रमाणे दिलीपभाऊ ठाकूर यांनी आपली सर्व कामे बाजूला ठेवून २४ तास कार्यालयातच मुक्काम ठोकला. योगायोगाने त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यांचे कार्य अतिशय जवळून पाहता आले. त्यांच्या मोबाईल मध्ये १२ हजारापेक्षा जास्त वैयक्तिक नंबर आहेत. अकराशेच्या आसपास वेगवेगळ्या क्षेत्राचे व्हाट्सअप ग्रुप आहेत. यावरून त्यांचा किती दांडगा जनसंपर्क आहे हे सिद्ध होते.अफाट निर्णय क्षमता आहे त्यांची. कोणते काम कोणाकडून कसे करून घ्यावे हे त्यांच्यापासून शिकण्या सारखे आहे. छोट्या छोट्या गोष्टींचे सूक्ष्म नियोजन करून त्याची अंमलबजावणी कशी होते या कडे त्यांचे वैयक्तिक लक्ष असते.लोकसभा निवडणुकीच्या कार्यकाळामध्ये गेल्या २० दिवसांमध्ये कार्यालयात येणाऱ्या अनेक प्रकारच्या कार्यकर्त्यांना आपल्या कुशल स्वभावाने आणि आपल्या कार्य कौशल्याने हाताळताना त्यांचा तोल सुटेलेला कधीच पाहिला नाही. जिल्हाधिकारी असो की पोलीस अधीक्षक यांच्यासोबत कोणत्याही विषयावर बोलताना ते कधीच घाबरत नाहीत. प्रशासनामध्ये आपल्या पक्षाची बाजू मांडणाऱ्या, वेगवेगळ्या परवानगी, वेगवेगळ्या सभा , मोर्चा उमेदवारांचे चिन्ह ह्या सगळ्या बाबतीत त्यांचा अभ्यास अतिशय दांडगा आहे. प्रशासकीय सेवेत जर दिलीपभाऊ गेले असते तर एक उत्तम प्रशासक म्हणून निश्चितच त्यांनी छाप पाडली असती यात कोणतीही शंका नाही. एक उत्तम वक्ता, अभ्यासू व्यक्तिमत्व, कुशल प्रशासक, एकनिष्ठ कार्यकर्ता, हाडाचा समाजसेवक, कलागुणांना वाव देणारा रसिक, सर्वांचे मन लावून ऐकून घेणारा श्रोता, मनमिळावू असे खरोखरचे अनुभव संपन्न अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे धर्मभूषण ड.दिलीपभाऊ ठाकूर

**–धनराज पि शिरोळे**
**भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र**
**प्रदेश उपाध्यक्ष,९७६५३ ५९१००**

# राज्यातील जनतेने जनाधार दिलाय भाजपा महायुतीचेच सरकार येणार
## भाजपा नेते आ.दरेकरांचा ठाम विश्वास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने स्पष्टपणे जनाधार दिलाय. भाजपा महायुतीचे सरकार येईल अशा प्रकारचे चित्र आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री होऊ शकत नाही, काँग्रेसचा मुख्यमंत्री होण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. मुख्यमंत्री हा महायुतीचाच होईल, असा ठाम विश्वास भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी व्यक्त केला.

पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले की, उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात प्रणिती शिंदे, सुशीलकुमार शिंदे यांनी अपक्ष उमेदवाराला समर्थन दिले. त्यांच्यातच पाडापाडी सुरू आहे हे महाराष्ट्र पाहतोय. ज्या पक्षांत एकवाक्यता नाही ते मुख्यमंत्री पदाचा उमेदवार ठरवायला निघालेत. मुंगेरीलाल के हसीन सपने असेच नाना पटोलेंच्याबाबतीत बोलावे लागेल.दरेकर पुढे म्हणाले की, एक्सिट पोल हा अंतिम नसतो. ८-९ एक्सिट पोलने महायुतीचे सरकार येईल असा अंदाज वर्तविला आहे. एखादा अपवादात्मक एक्सिट पोल असू शकतो. काही झाले तरी राज्यात महायुतीचेच सरकार बनेल यावर आमचा विश्वास आहे. तशा प्रकारचे वातावरण, महाराष्ट्रातील जनतेने मतदान केल्याचे दिसतेय. तसेच अपक्ष निश्चितच काही प्रमाणात निवडून येतील. अपक्ष हे सत्ता बनते त्या बाजूने सातत्याने असतात. महायुतीचे सरकार बनत असताना अपक्ष महायुतीच्या बाजूने राहतील. काही अपक्ष महायुतीतील पक्षाचेच निवडून येण्याची जास्त शक्यता आहे. ते आपल्या मूळ घरात येतील.

संजय शिरसाट यांच्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, शिरसाट यांची भूमिका ही पक्षाची अधिकृत भुमिका असल्याचे वाटत नाही. जर ती पक्षाची अधिकृत भुमिका असती तर त्यावर भाष्य करणे योग्य असते. उद्धव ठाकरे, शरद पवारांच्या, महाविकास आघाडीच्या विरोधात शिंदे यांनी निवडणूका



लढवल्या आहेत. ज्या विचारातून त्यांनी महायुती किंवा भाजपासोबत युती केलीय अशा प्रकारची तिळमात्र गोष्ट होऊ शकत नाही, असा ठाम विश्वास आहे. बच्चू कडू यांच्या विधानावर दरेकर म्हणाले की, कडू राणा भीमदेवी थाटात बोलण्यात पटाईत आहे. त्यांचे किती उमेदवार निवडून येताहेत ते जाहीर करावे. त्यांची स्वतःची जागा धोक्यात आहे. निवडून येताना त्यांचीच दमछाक होणार आहे. राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावर दरेकर म्हणाले की, राहुल गांधी यांनी अमेरिकेत जावे. परदेशातच त्यांचे जास्त उपक्रम चालू असतात. तेथे जाऊन तिथल्या सरकारला गुन्हा दाखल झाला आहे तर अटकेची कारवाई करण्याची मागणी करावी. इथे बसून तिथे काय चालू आहे यावर भाष्य करणे आणि त्या आधारे सरकार पडणार म्हणजे आत्याबाईला मिशा असत्या तर... अशा प्रकारचे त्यांचे वक्तव्य बालिशपणाचे आहे. संजय राऊत यांच्या दाव्यावर दरेकर म्हणाले, राऊतांचा दावा म्हणजे प्रचंड आत्मविश्वासाचा सागर असतो. त्यांनी फक्त एवढेच सांगावे आमचा मुख्यमंत्री होणार आणि संजय राऊत मुख्यमंत्री झाले तर आश्चर्य वाटायला नको, एवढेच बोलायचे ते राहिलेत. संजय राऊत यांच्या बोलण्याला कुठल्याही प्रकारचा आधार नसतो. निराधार, बेताल, कुठलीही पार्श्वभूमी नसणारी वक्तव्य राऊत यांची असतात. ते वाट्टेल ते बोलतात आणि आरोप करतात. त्याचबरोबर बिटकॉईन आणि कॅश प्रकरण हे अत्यंत गंभीर विषय आहेत. बिटकॉईनसंदर्भात सुप्रिया सुळे यांचे नाव पुढे येतेय. त्यातून पैसे उभा केल्याचे समोर येतेय. त्यात गौरव मेहता हे जे नावं समोर येतेय त्यावर ईडीच्या धाडी पडल्याचे समजतेय. याचे धागेदोरे महाविकास आघाडीच्या कुणापर्यंत गेलेत ते यथावकाश कळेल, असेही दरेकर म्हणाले.दरेकर पुढे म्हणाले की, मतदान टक्केवारी वाढण्याला आमची मातृसंस्था आरएसएस कारणीभूत आहे. त्यांनी मतदानाचा टक्का वाढला पाहिजे अशा प्रकारचे अभियान सुरू केले. हजारोंच्या छोट्या मोठ्या बैठका घेऊन सर्वांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. तसेच बूथ स्तरावर मतदान वाढविण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. लोकसभेला मतदान यंत्रणा ढिसाळ होती. आता ७००-८०० चे बूथ करून गर्दीमुळे जो मतदार मतदानाला जात नव्हता ते आता सोपे झाले. अशा सर्व कारणांनी मतदान वाढले आहे. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना आणली. २ कोटी ६० लाख महिलांना थेट याचा लाभ होतोय. ही योजना बंद करायला काँग्रेसवाले गेले होते. अशावेळी चुकून काँग्रेसचे सरकार आले तर ही योजना बंद होईल अशी भीती लाडक्या बहिणींच्या मनात होती. आपल्या लाडक्या भावांचे सरकार वाचले पाहिजे या पोटतिडकीने महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान करून आशीर्वाद दिले, असल्याचेही दरेकर म्हणाले.शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या विधानावर दरेकर म्हणाले की, जितेंद्र आव्हाड यांनी फ्रान्सलाच जाऊन निवडणूक लढवावी आणि तिकडे फ्रान्सचे प्रमुख व्हावे. फ्रान्स आणि महाराष्ट्रातील निवडणुकीचा संबंध काय आहे. गुवाहाटीला गेले तर एवढी चर्चा केली मग फ्रान्सला गेल्यावर काय होईल? असा मिश्किल टोलाही दरेकरांनी लगावला.

# विजयाचा कॉन्फिडन्स! निकालापूर्वीच आमदार जगताप यांचे झळकले बॅनर







लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी चुरशीने मतदान झाले. जिल्ह्यातील १२ ही विधानसभा मतदारसंघात मतदानाच्या शेवटच्या क्षणापर्यंत काँटे की टक्कर पहावयास मिळाली. जिल्ह्यात सरासरी ७१ टक्के मतदान झाले आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असली तर निकालापूर्वीच नगर शहर व पारनेर मतदारसंघात आमदार संग्राम जगताप व राणी लंके यांचे विजयाचे फ्लेक्स झळकले आहेत.

२० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील १२ ही मतदारसंघात मोठ्या चुरशीने मतदान झाले असून सरासरी ७१ टक्के मतदान झाले आहे. मतदानाचा टक्का वाढल्याने नेमका धक्का कोणाला बसतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अशातच आता चौकाचौकात कोण विजयी होणार कोण पराभूत होणार याच्या खमंग चर्चा रंगू लागल्या आहेत. मतदान केंद्रनिहाय कोणाला किती मतदान होईल याची आकडेमोड जोरात सुरु आहे. अनेकांच्या पैजाही पडल्या आहेत.

आपल्या उमेदवाराचा विजय निश्चित असल्याचे गृहीत धरुन नगर शहर विधानसभा मतदारसंघात व पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात आमदार संग्राम जगताप व राणी निलेश लंके यांच्या विजयाचे फ्लेक्स झळकले आहेत. निकालापूरवीच फ्लेक्स झळकल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार-जितेंद्र आव्हाड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

एक्झिट पोलचे अंदाज काहीही असले तरी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील जनतेला सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांची मुजोरी आवडलेली नाही. त्यामुळे मविआचे १६० हून अधिक आमदार निवडून येतील, असे ते म्हणालेत.महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी मतदान झाले. त्यानंतर जारी झालेल्या एक्झिट पोलमध्ये सत्ताधारी महायुतीला अनुकूल वातावरण असल्याचा दावा करण्यात आला. जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी त्यावर भाष्य करताना राज्यात कोणत्याही स्थितीत महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, जनतेला महायुती सरकारच्या नेत्यांना आलेली मुजोरी आवडलेली नाही. वहिणींना बारामतीत थांबवणे, दाराबाहेर उभे करणे, अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक करून त्यांचे डोके फोडणे, जागोजागी पैसे वाटणे, विनोद तावडेंसारख्या मोठ्या नेत्यांजवळ ५ कोटी मिळणे यासारख्या गोष्टी जनेतला आवडणाऱ्या नाहीत.शरद पवारांनी अवघी बारामती घडवली. पण त्यांच्याच पत्नीला दाराबाहेर मॉलच्या थांबवण्यात आले. त्यांना आतमध्ये प्रवेश देण्यात आला नाही. हे कोणत्या कायद्यात बसते? आता माणुसकीचा लवलेश नसणारी माणसे राजकारणात आली आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे सर्व भागातील आमदार निवडून येतील. त्यांची संख्या १६० च्या वर असेल.जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी मुख्यमंत्रीपदावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावरही निशाणा साधला. प्रत्येकाला आपण मुख्यमंत्री व्हावे असे वाटते. सर्वांना तशी हौस असते. असे बोलल्याने ५ मिनिटांचा आनंद मिळतो. काही जण त्याचा आनंद घेतात. मी मुख्यमंत्री होणार असे म्हटल्याने मलाही आनंद मिळतो, असे ते उपरोधिकपणे नाना पटोले यांना टोला हाणताना म्हणाले.एकनाथ शिंदे काय होणार? देवेंद्र फडणवीस काय होणार? याच्याशी आम्हाला कोणतेही देणेघेणे नाही. आमच्या मुख्यमंत्री होत असताना आम्ही त्यांचा पाहण्यास कशाला जावे? राज्यात सत्ता परिवर्तन होणार असून, महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, असे ते म्हणाले.

# केंद्र सरकार ऊसदर देतेपण साखरेला भाव देईना-नागवडे
## नागवडे कारखान्याचा ५० वा गळीत हंगामला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

प्रत्येक शेतकऱ्यांना वाटते आपल्या ऊसाला जास्त भाव मिळाला पाहिजे. परंतु आपले सभासद सहकारी संस्थेला ऊस देत नाहीत आणि खाजगी कारखान्याला ऊस घालतात,त्यामुळे सहकारी कारखान्याला खाजगीशी स्पर्धा करुण निकष लावून ऊसाला दर जाहीर करावा लागतो. केंद्र सरकार ऊसाला दर देते पण मार्केट मध्ये साखरला भावदेत नसल्याने अडचणी निर्माण होतात अशी खंत नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी बोलताना सांगितले.

दि.२१ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील स्व.शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या पंन्नासाव्या अग्नीप्रतिपण व गव्हाणपुजन कारखान्याचे अध्यक्ष श्री व सौ.अनुराधाताई राजेंद्र नागवडे सह संचालक कल्पना विठ्ठल जंगले,मिनाक्षी भाऊसाहेब नेटके,अल्पना बंडू जगताप व अरुणा सावता हिरवे ह्या पाच जोडीच्या हस्ते विधीवंत पूजा करुण गळीत हंगामाचा शुभारंभ झाला. कारखाना उपाध्यक्ष बाबासाहेब भोस यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी बोलताना अध्यक्ष राजेंद्र नागवडे म्हणाले कि



विधानसभा निवडणूकीत अनेकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी शासनाने साखर कारखाने पंधरा दिवस उशीरा सुरु करण्यास सांगितले. परंतु आता प्रत्येक शेतकऱ्यांना वाटते माझा ऊस लवकर गेलातर पुन्हा शेतामध्ये गहू,कांदा सह इतर पिक घेता येईल. ज्यांच्या नोंदी आहेत. त्यांना प्राधान्य देवून तारखेनुसार ऊसतोड द्यावी लागते.गेल्यावर्षी ऊसतोड मजुरांनी फसविले. त्यामुळे यंदा याची दखल घेऊन ऊसतोड टोळ्या, जुगाड तसेच यांत्रिक हार्व्हेस्टर वाढविले आहे. पण मोठे शेतकरी खाजगी कारखान्याला ऊस देतात आणि भावाची स्पर्धा आमच्या बरोबर विरतात. तालुक्यात काहींनी स्वांताच्या ऊसाचे, कामगारचे पैसे दिले नाही. तरी लोक तिकडे पळतात याचे वाईट वाटते.सर्वांनी सहकार्य केले तर सहकारी कारखाना चालेल.सहकार आणि स्पर्धेत टिकायचे असेल तर आपल्या नागवडे कारखान्याला सर्वांनी ऊस घाला जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या बरोबरीने भाव देवू यासाठी राज्यात सहकारी पेक्षा खाजगी कारखाने जास्त झाल्याने भविष्यात सहकार मोडीत निघून खाजगी कारखान्यांची मक्तेदारी होईल.यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान पण होईल.पूर्वी काहीज सांगायचे दोन रुपयांचे सभासदांना साखर देता येते परंतु त्यांचे खाजगी कारखाने झाल्यानंतर समजले कि देता येत नाही. कारखाना तोट्यात जातो. विकायची वेळ येते.असे म्हणत नागवडे यांनी पाचपुते आणि जगताप यांचे नाव न घेता त्यांना चिमटे काढले. म्हणून बाहेरील साखर कारखाने अमिश दाखवून ऊस नेतील पण सहकार अडचणीत आनू नका म्हणून आपल्याच कारखान्याला ऊस देवून सहकार वाचवा असे आव्हान नागवडे यांनी केले आहे.यावेळी बाबासाहेब भोस यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमाला जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे, प्रशांत दरेकर, जीवन शिपलकर, संतोष खेतमाळीस,मारुती पाचपुते, याच्यासह सभासद शेतकरी कामगार हजर होते.प्रास्ताविक संचालक सुभाष शिंदे यांनी करुण संचालक शरद जगताप यांनी आभार मानले.

# परळी विधानसभेचा २६ फेऱ्यात आज लागणार निकाल धनंजय मुंडे अन् राजेसाहेब देशमुखांत थेट लढत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

विधानसभेच्या निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघातील ३६३ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर रोजी पूर्ण झाली असून २३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता येथील शक्तीकुंज वसाहतीतील नवीन क्लब बिल्डींग मध्ये मतमोजणीस प्रारंभ होणार आहेत. मतमोजणीची निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून तयारी करण्यात आली आहे. परळी विधानसभा मतदारसंघात ७५.२७% मतदान झाले आहे. एकूण तीन लाख ३७ हजार ९६६ एवढे मतदार असून त्यापैकी दोन लाख ५४ हजार ३८३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या शक्ती कुंज वसाहतीतील नवीन क्लब बिल्डिंगमध्ये मतपेट्या ठेवण्यात आलेले आहेत. या ठिकाणी कडेकोट पोलीस बंद ठेवण्यात आला आहे. सध्या तीन पोलीस निरीक्षक १२ एपीआय, पीएसआय ५४ पोलीस कर्मचारी, एसआरपीएफ व सीआरपीएफचे एक प्लेटून बंदोबस्तासाठी ठेवण्यात आलेले आहेत. उद्या मतमोजणी वेळी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आज दुपारी चार नंतर नेमण्यात येणार आहे. मतमोजणी सकाळी आठ वाजता प्रारंभ होणार असून दुपारी दोन दरम्यान मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईल अशी माहिती परळीचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी परळी ते तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिली. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी,बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी महिंद्रकुमार कांबळे, परळीचे निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर ,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी त्रिंबक कांबळे, तेजस्विनी जाधव, व्यंकटेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी होणार आहे.

**२६ फेऱ्यात लागणार निकाल**

परळी मतदारसंघातील अकरा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गटा) धनंजय मुंडे आणि महाविकास आघाडीकडून




राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार राजसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत होत आहे. मतमोजणीसाठी एकूण १४ टेबल असून. मतमोजणीच्या एकूण २६ फेऱ्या होणार आहेत. डीग्रस या गावातील मतांच्या सर्वात प्रथम मतमोजणी होणार आहे. तर बागझरी येथील मतांची सर्वात शेवटी मतमोजणी होणार आहे. प्रत्येक मतमोजणी टेबलवर चार अधिकारी व कर्मचारी नियुक्त असतील असे एकूण ५६ अधिकारी कर्मचारी हे काम पाहणार आहेत. तर टपाली मतपत्रिका मोजण्यासाठी सहा टेबल ची सोय करण्यात आली आहे व सैन्य दलातील मतदारांची मतमोजणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे.परळी विधानसभा मतदारसंघात धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत होत आहे.

**महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या जमेच्या बाजू**

गेल्या बावीस वर्षापासून जिल्हा परिषद सदस्य ते कृषी मंत्री या पदाच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांचा परळी मतदारसंघात कार्यकर्ते, मतदारांशी असलेला थेट संपर्क, केलेली विकासाची कामे, लोकांचे सोडविलेलेलेले प्रश्न तसेच त्यांची प्रचाराची व कामाची यंत्रणा चांगली होती. ओबीसी समाज धनंजय मुंडे यांच्या बाजूने एकवटला गेला. तसेच भाजपाचे राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांची साथ धनंजय मुंडे यांना मिळाली आहे.

**महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या जमेच्या बाजू**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे पाठबळ, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांची साथ, महाविकास आघाडीच्या परळीतील सर्व पदाधिकाऱ्यांनी केलेले काम. मराठा चेहरा म्हणून राजकीय क्षेत्रात परळी मतदारसंघात आलेले महत्व. बीड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष व जिल्हा परिषद शिक्षण समितीचे सभापतीपद भूषविल्यामुळे मतदारांशी जवळून संपर्क आहे,

# बाल संस्कार वर्गाला मुलांचा प्रतिसाद;दर रविवारी आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने समर्थ नगरमधील श्रीराम मंदिरात बाल संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात बालकांमध्ये संस्कार, आहार-विहार, व्यायाम, योगासह श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक तसेच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी रचलेले श्रीमारुती स्तोत्र, त्रिकाल संध्या याचबरोबर श्रीज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान उपस्थित मुलांच्या मुखातून वदवून घेण्यात आले.

यानिमित्त चिन्मय संस्थानचे श्रीअपनेशानंद स्वामी व श्री समर्थ रामदास स्वामी अभ्यासक सुषमाताई धांडे यांनी उपस्थित मुलांना व पालकांना श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. मुलांनी दैनंदिन जीवनामध्ये कशाप्रकारे वर्तन असावे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर चिन्मय संस्थांचे श्रीआत्मसानंद स्वामी यांच्या हस्ते श्रीरामाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी संस्थे अंतर्गत चालू असलेल्या वेगवेगळ्या अभियानाबद्दल माहिती दिली. संस्थेचा मुख्य उद्देश श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्यांचा प्रचार व प्रसार करणे हा आहे, असे यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजुरकर यांनी, तर आभार प्रदर्शन सहसचिव प्रकाश सनान्से यांनी केले.दरम्यान, चिन्मय संस्थेचे श्रीआत्मेशानंद स्वामी यांचा सत्कार संस्थेचे संपर्कप्रमुख नरेश देवळे व संस्थेचे पदाधिकारी गजानन देशमुख व सुधीर पोतदार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले. उपस्थित मुलांना संस्थेतर्फे खाऊ वाटप करण्यात आला. प्रत्येक मुलाला श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांचे पुस्तके देण्यात आली. यावेळी मुलांसह त्यांचे पालक उपस्थित होते उपस्थित होते. संस्थेअंतर्गत हा बाल संस्कार वर्ग यानंतर प्रत्येक रविवारी ८.३० ते ९.३० यावेळेत समर्थनगरमधील श्रीराम मंदिरात घेतला जाईल. जास्तीत जास्त मुलांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी सर्वांना केले.


# आरोग्य विभागातर्फे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

कुटुंब नियोजन ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाच्या वतीने आजपासून (दि.२१) ते बुधवार दि.४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी विषयी जनजागृती करणे, लोकांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवुन देणे, स्त्रीयांप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी ही पुरुषांची सुद्धा आहे, या विषयी माहिती देऊन समुपदेशन करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

हे अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात दि.२१ ते दि.२७



नोव्हेंबर दरम्यान लाभार्थ्यांशी संपर्क साधणे. त्यांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवून देणे व प्रवृत्त करणे, योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करणे.ज्यांनी यापुर्वी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे.अशा लाभार्थ्यांमार्फत मोहीमेचा प्रचार व प्रसार करुन माहीती देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२८ नोव्हेंबर ते दि.४ डिसेंबर 'सेवा आठवडा' म्हणुन राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय लाभार्थ्यांचे शस्त्रक्रियेसाठी पूर्व नोंदणी करुन शिबिरे आयोजित करण्यात येतील. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असुन लाभार्थ्यास १ हजार ४५१ रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.या अभियानात जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बाळकुष्ण लांजेवार यांनी केले आहे.

# राहुरी फॅक्टरी येथील पत्रकाराचा अपघातात मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी फॅक्टरी येथील सुर्यानगर येथील रहिवासी मनोज संतुराम हासे यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी १२ वाजेदरम्यान राहुरी फॅक्टरी येथील वाणी मळा शिवारात नगर-मनमाड मार्गावर घडली आहे.या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पत्रकार मनोज हासे (वय वर्ष-४२) हे त्यांच्याकडील असलेल्या दुचाकीवरून नगर-मनमाड मार्गावरून जात असताना वाणीमळा पुलावर अज्ञात वाहनाने दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ते जागीच मृत्युमुखीपडले. याचवेळी पारनेर येथील विधानसभा निवडणुकीची ड्युटी उरकून गणेगाव येथे घरी जात असलेल्या होमगार्ड चांगदेव कोबरणे, होमगार्ड सतीश कोबरणे यांना हासे हे मृत्युमुखी अवस्थेत दिसून आले असता घटनास्थळी तातडीने रुग्णवाहिका चालक रवी देवगिरे यांना बोलाविण्यात येऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. घटनास्थळी राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे, अशोक शिंदे, बाबासाहेब शेळके, प्रवीण बागुल तसेच हॉटेल साई समाधानचे दत्तात्रय दरंदले, राजमुद्रा उद्योग समूहाचे प्रशांत मुसमाडे, पत्रकार श्रीकांत जाधव, मंगेश ढुस, निखिल गोपाळे, अक्षय गाडेकर , पत्रकार शरद पाचारने, बबन आहेर, यांनी मदतकार्य केले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# बसच्या सीटखाली नोटांचे बंडल; दोन दिवसांपूर्वीच निवडणूक कामांत होती बस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्यातील २८८ विधानसभा निवडणुकांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. यंदा प्रथमच ६६ टक्क्यांपर्यंत मतदान वाढल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे गेल्या ३० वर्षातील हा मतदानाचा सर्वाधिक टक्का असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे, आता सर्वांना निकालाचीच उत्सुकता लागून राहिली आहे. मात्र, निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकांची घोषणा केल्यानंतर राज्यात आदर्श आचरसंहिता लागू करण्यात आली आहे. तेव्हापासून स्थीर पथक आणि भरारी पथकाने पोलिसांच्या मदतीने कोट्यवधी रुपयांची बेकायदेशीर रोकड व मौल्यवान वस्तू जप्त केल्या आहेत. निवडणूक काळात या पैशाचा व वस्तूंचा वापर केला जात होता, याबाबतचा तपासही करण्यात आला. तर, मतदानाच्या आदल्यादिवशीही अनेक मतदारसंघात नोटांचे बंडल पाहायला मिळाले. मतदारांना पैसे वाटल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मात्र, आता चक्क धावत्या एसटी बसमध्ये नोटांचा बंडल सापडल्याने खळबळ उडाली आहे.अहमदनगर जिल्ह्यात एका एस टी बसच्या सीटखाली प्रवाशाला नोटांचा बंडल आढळून आल्याची घटना उघडकीस आली आहे. ५०० रुपयांच्या नोटांचे दोन बंडल सापडल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील ही घटना असून एसटी आगार व पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे. या बसमधून प्रवास करणाऱ्या एका युवकाने मनाचा मोठेपणा आणि प्रामाणिकपणा जपत बसमधील वाहकाकडे नोटांचे हे दोन्ही बंडल सुपूर्द केले आहेत. मतदानाच्या दुसऱ्या दिवशी चक्क एस.टी बसमध्ये मोठी रक्कम मिळून आल्याने उलट सुलट चर्चेला उधाण आहे. तसेच, ही रक्कम नेमकी कोणाची आहे, कोणत्या कामासाठी ही रक्कम बसमधून नेण्यात येत होती, याचाही तपास करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे मतदानच्या एक दिवस अगोदर, दोन दिवसांपूर्वी हीच बस स्ट्राँग रुमपासून ईव्हीएम आणि कर्मचाऱ्यांना घेऊन मतदान केंद्रावर गेली होती. त्यानंतर काल याच बसने कोपरगाव -वैजापूर-कोपरगाव अशा फेऱ्या केल्या आहेत. काल सायंकाळी कोपरगावहून धामोरीकडे जात असताना बसमधील एका विद्यार्थ्याला शेवटच्या सीटखाली नोटांचे दोन बंडल सापडले आहेत. या दोन्ही बंडलमधील नोटांची बेरीज केली असता तब्बल ८६ हजारांची रोख रक्कम सापडल्याचे पाहायला मिळत आहे. एव्हढी मोठी रक्कम नेमकी कुणाची आणि बसच्या सीटखाली कशी आली? याबाबत पोलीस तपासात सर्वगोष्टी निष्पन्न होतील. सध्या बसमधील वाहकाकडून ही रक्कम संबंधित तपास यंत्रणेकडे देण्यात आली आहे.

## बीड शहरातील रबर उडुन गेलेले रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधके) अपघाताला निमंत्रण

# लोखंडी नट बोल्ट उघडे पडल्याने टायर फुटुन संभाव्य अपघाताचा धोका-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहरांतर्गत नव्याने तयार करण्यात आलेल्या धुळे ते सोलापूर सिमेंट काँक्रीट राष्ट्रीय महामार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी असणारी अपघात प्रवण क्षेत्र असणारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पोलिस अधीक्षक कार्यालय तसेच जिल्हा रुग्णालय याठिकाणी रस्ता क्रॉसींग असुन या ठिकाणी बसविण्यात आलेली रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधके) दुरावस्थेत असुन तुटल्याने रबर उडुन गेल्याने गतिरोधकाचे लोखंडी नट बोल्ट उघडे पडले असुन त्यामुळे वाहनांचे टायर पंक्चर होऊन अथवा फुटुन अपघाताचा धोका वाढला असुन तातडीने नविन रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधक) बसविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी नितिन गडकरी, प्रकल्प संचालक तथा व्यवस्थापक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर,कार्यकारी अभियंता





राष्ट्रीय महामार्ग बीड, जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन आठवडाभरात नविन गतिरोधक न बसवल्यास दि.०२ सोमवार रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे.

अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या ठिकाणी नागरीकांकडुन गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येते त्याठिकाणी नागरीकांचा रोष कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून गतिरोधक बसविण्यात येतात.मात्र त्याची नंतर देखभाल करण्यात येत नसुन आता हेच गतिरोधक अपघातांना कारणीभूत ठरत असुन रबरी गतिरोधक तुटल्याने रबर उडुन गेल्याने उघडे पडलेल्या लोखंडी नट बोल्ट मुळे वाहनांचे टायर पंक्चर अथवा फुटून अपघात होत आहेत. त्यामुळे तातडीने नविन गतिरोधक बसविण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

गेल्यावर्षी ४ ऑक्टोबर २०२३ रोजी बीड शहरांतर्गत अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या जिल्हा रुग्णालय क्रॉसिंग ,पोलीस अधीक्षक कार्यालय समोर , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकामध्ये रबरी गतिरोधकांचे रबर रबर उडुन केवळ लोखंडी नट बोल्ट शिल्लक राहिल्याने वाहनधारकांना त्रास होत होता त्याचबरोबर वाहनांचे टायर फुटुन अपघाताचा धोका वाढला होता.संबधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे तत्कालीन पोलीस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांना दि.९ ऑक्टोबर रोजी रास्तारोको आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर याची तात्काळ दखल घेत शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे निरीक्षक केतन राठोड यांना संबंधित प्रकरणी राष्ट्रीय महामार्गाचे व्यावस्थापक यांना आवश्यक उपाययोजना करणेबाबत तातडीने गतिरोधकाची दुरुस्ती करण्याचे कळवले होते.त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नविन गतिरोधक बसविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विद्यमान पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी कारवाई करतील अशी अपेक्षा डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904